महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

Tel: 022 – 22620697
Email ID – ps.azadmaidan.mum@mahapolice.gov.in

Office of the Sr. Inspector of Police,
Azad Maidan Police Station,
Mumbai

वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे कार्यालय, आझाद मैदान पोलीस ठाणे,
महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१

जा.क्र. 10296/वपोनि/प्रशा/आमैपोठा/२०२६ दिनांक - १३/०९/२०२६

प्रति,

श्री. मनोज रावसाहेब जरांगे पाटील,
(श्री. मनोज जरांगे पाटील यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री.गंगाधर नाना काळकुट्टे)
पत्ता-अंतरवाली सराटी,ता.अंबड,जि.जालना.

ज्याअर्थी, आपला दिनांक १९/०९/२०२६ रोजी पासून ''मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या संदर्भात आझाद मैदान, मुंबई येथे प्रस्तावित आंदोलन, उपोषण व धरणे'' याबाबतचा आपण केलेला अर्ज दिनांक १२/०९/२०२६ रोजी आझाद मैदान पोलीस ठाणेस प्राप्त झाला आहे.

ज्याअर्थी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-क वर्ष ११, अंक ३०, मंगळवार, ऑगस्ट २६, २०२५/भाद्रपद ४, शके १९४७, असाधारण क्रमांक.४५, प्रधिकृत प्रकाशन अन्वये जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका (अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात) नियम २०२५, ही नियमावली तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये आंदोलकांना सार्वजनिक सभा, संमेलने, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, धरणे, मेळावे, मिरवणुका इत्यादीसाठी आझाद मैदान (भाग), निश्चित करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ११ (ड) नुसार आंदोलनात सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती, आत्मदहनाचा प्रयत्न करणार नाही किंवा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणार नाही किंवा उपोषण करणार नाही असे नमुद करण्यात आले आहे. परंतु आपण आज दि.१२/०९/२०२६ रोजी अंतरवाली सराटीमध्ये घेतलेल्या सभेमध्ये जाहिर केलेले आहे कि,''खोपोली फायनल पकडुन चला, पाचव्या दिवशी आपण सकाळी १०:०० वा. आझाद मैदानला आमरण उपोषन सुरू करतोय''. तसेच आपण केलेल्या अर्जामधील नमुना 'अ' मधील परिच्छेद क्र. ६ मध्ये ''आंदोलन व आमरण उपोषन'' असे नमुद केले आहे. मागील वर्षी आपण दि.२९/०८/२०२५ पासुन पुढे अनिश्चीत कालावधीसाठी आमरण उपोषन सुरू केले होते. यातुन माझी खात्री झालेली आहे कि, तुम्ही ''जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ११ (ड)'' या नियमाचा भंग करणार आहे.

ज्याअर्थी, सदर नियमावलीच्या नियम क्र. ४ (६) (च) मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की,''कोणत्याही आंदोलनास, एकाच वेळी फक्त एकच दिवसासाठी परवानगी देण्यात येईल. शनिवार, रविवार व इतर शासकीय किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कोणतीही परवानगी देण्यात येणार नाही. तसेच नियम क्र.१० मध्ये आंदोलनाची वेळ सकाळी ९:०० वा.ते सायंकाळी ६.०० वा. अशी निश्चीत करण्यात आलेली आहे. नियम क्र.११(झ) संध्याकाळी ६.०० वा.विनिर्देशित क्षेत्र रिकामा करण्याबाबत नमुद आहे. दि.१२/०९/२०२६ रोजी प्राप्त आपल्या अर्जामध्ये नमुद

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र'ब' मध्ये ''दि.१९/०९/२०२६ रोजी आमरण उपोषन'' करणार असल्याचे नमुद केले आहे. दि.१९/०९/२०२६ शनिवार हा शासकिय सुट्टीचा दिवस आहे. आपल्या अर्जामध्ये प्रपत्र ब मध्ये ''दि. १९/०९/२०२६ व पुढील आंदोलन संदर्भाधीन मागण्या मान्य होईपर्यंत'' असे नमुद केले आहे.

सन २०२५ मध्ये आपल्याला जाहिर सभा, आंदोलने व त्या अनुषंगाने देण्यात आलेल्या परवानगी नुसार आपण दिनांक २९/८/२०२५ रोजी सायंकाळी १८.०० वा.आंदोलन स्थगित करणे अपेक्षित होते. परंतु आपण नियमांचे पालन न करता आपले आंदोलन दिनांक ०२/०९/२०२५ रोजी पर्यंत सुरू ठेवलेले होते. तसेच सन २०२५ मध्ये आंदोलन सुरू करण्यापुर्वी आपणास नियमावलीची प्रत्र अदा करण्यात आली होती. तरी सुध्दा आपण सदरच्या नियमावलीचा भंग केला होता. त्यामुळे आपले आंदोलन दि.१९/०९/२०२६ रोजी संध्याकाळी १८:०० वा. स्थगित होणार नसल्याचे स्पष्ट होत आहे. यातुन माझी खात्री झालेली आहे कि, तुम्ही ''जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ४(६)(च),नियम क्र.१० व नियम क्र.११(झ)'' या नियमाचा भंग करणार आहे.

ज्याअर्थी, नियम क्र. ५ नुसार असे नमूद करण्यात आलेले आले आहे कि, आंदोलनातील वाहनांच्या वाहन तळासाठी वाहतुक पोलीसांशी विचार विनीमय करून परवानगी देता येईल. तसेच माल वाहतुकीची किंवा जड वाहने यांना परवानगी असणार नाही, असे नमुद आहे. तरी दि. १२/०९/२०२६ रोजी अंतरावाली सराटी याठिकाणी झालेल्या सभेमध्ये आपण असे जाहिर केलेले आहे कि,'' आजच्या आज मुंबईला जावु शकता का? नाही कारण गाडया आहेत लाखात''.यातुन असे स्पष्ट होत आहे कि, आपल्या आंदोलनामुळे वाहतुक कोंडी होवुन सार्वजनीक वाहतुक व्यवस्था विस्कळीत होईल. यापुर्वी सन २०२५ मधील आपल्या आंदोलनामधील ठराविक वाहनांना परवानगी देण्यात आलेली होती. तसेच वाहतूक पोलिसांशी विचार विनिमय करून आपल्या वाहनांनी मुंबईत प्रवेश केल्यानंतर ते ईस्टर्न फ्री वे या मार्गाने वाडीबंदर जंक्शन पर्यंत नेता येतील व पुढे मुख्य आंदोलकांसोबत फक्त ५ वाहने आझाद मैदान येथे जातील व इतर सर्व वाहने ही वाडीबंदर येथून पोलिसांनी निर्देशित केलेल्या शिवडी-२ शेड व कॉटनग्रीन परिसरातील नियोजित ठिकाणी पार्किंग करिता नेण्यात येतील, आपणास दिलेल्या परवानगी पत्रात असे विवक्षित निर्देश आपणास देण्यात आलेले असताना देखील, आपण दक्षिण मुंबईतील आझाद मैदान व उपरोक्त नमूद परिसरामध्ये सुमारे ५००० वाहने आणून, सर्व मुख्य मार्गावर व चौका-चौकात सदर वाहने उभी करून वाहतूक कोंडी व अडथळे निर्माण केले होते. यातुन माझी खात्री झालेली आहे कि,तुम्ही ''जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ५'' या नियमाचा भंग करणार आहे.

ज्याअर्थी, जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र- ६ अन्वये आंदोलकांची कमाल संख्या ही ५००० पर्यंतच ठेवणे बंधनकारक आहे. आपण दि.१२/०९/२०२६ रोजी केलेल्या आपल्या अर्जात नमुना ब मध्ये ''अंदाजे ५,००० किंवा जास्त'' असे ''सहभागी होणाऱ्यांची संख्या'' नमुद केले आहेत. तसेच दि.१२/०९/२०२६ रोजी अंतरवाली सराटी या ठिकाणी झालेल्या सभेमध्ये आपण असे जाहीर केलेले आहे कि,'' आजच्या आज मुंबईला जावु शकता का? नाही, कारण गाडया आहेत लाखात '' आणि ''मुंबईत बसण्यासाठी सुध्दा लाखों करोडोंने या''. असे आपण आवाहन केलेले आहे.

आपणांवर सन २०२५ मध्ये केलेल्या आंदोलनामध्ये ५००० आंदोलकांची मर्यादा ठेवणे बंधनकारक होते. तसेच आझाद मैदानामधील ७००० चौरस मीटर हे आंदोलनासाठी राखीव

Scanned with OKEN Scanner

ठेवण्यात आलेले असून, त्याची क्षमता ५००० पर्यंत आंदोलकांनाच सामावून घेण्याऐवढी आहे. तेथे त्यापेक्षा जास्त संख्येने आंदोलक आल्यास त्यांना थांबण्यासाठी मैदानात पुरेशी जागी उपलब्ध होणार नाही, असे आपणांस कळवून सुध्दा आपण दि.२९/०८/२०२५ रोजी सुरू केलेल्या आंदोलनात आझाद मैदान येथे सुमारे ४०,००० आंदोलकांचा समावेश केला होता. सदरची बाब पाहता आपण ५००० पेक्षा जास्त आंदोलक आणून नियम क्र. ०६ चा भंग केलेला होता. वरील बाबी पाहता माझी खात्री झालेली आहे कि, तुम्ही ''जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ६'' या नियमाचा भंग करणार आहे.

सन २०२५ साली आपण आंदोलनासाठी अर्ज करण्यापूर्वी इतरही आंदोलकांनी दिनांक २९/८/२०२५ रोजी आंदोलनासाठी परवानगी मागितलेली होती. इतर आंदोलन करणाऱ्या आंदोलकांचा आंदोलन करण्याचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी आंदोलकांच्या ५००० संख्येमध्ये त्यांचा देखील समावेश असेल व त्या आंदोलकांना मैदानातील पुरेशी जागा उपलब्ध करून देणे हे आपणावर बंधनकारक होते, असे परवानगी पत्रात आपणांस सूचित करण्यात आले होत. परंतु, आपल्या आंदोलनाने संपूर्ण परिसर व्यापल्याने त्या दिवशी इतर आंदोलनांना परवानगी देता आली नाही. त्यामुळे त्यांचा आंदोलनाचा हक्क बाधित झालेला होता. त्यामुळे आपण नियम क्र.६ चा भंग करणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

ज्याअर्थी, नियम क्र. ७ मध्ये विनिर्देशित केलेल्या क्षेत्राच्या दिशेने आणि क्षेत्राकडून मोर्चा नेला जाणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. दि.१२/०९/२०२६ रोजी अंतरवाली सराटी येथे झालेल्या विराट सभेमध्ये ''मुंबईत बसण्यासाठी सुध्दा लाखों करोडोंने या'' असे आपणा कडुन आवाहन करण्यात आलेले आहे. तसेच लाखों वाहने आणण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. परंतु आपल्या आंदोलकांनी सन २०२५ च्या आंदोलना दरम्यान मोठ्या प्रमाणात सी. ,एस.एम.टी, चर्चगेट ही रेल्वे स्थानके, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, हुतात्मा चौक, मेट्रो जंक्शन, ओ-सी-,स- जंक्शन, सी-,एस-,एम-टी- जंक्शन, इ. ठिकाणी मोर्चे नेऊन रस्ता रोको केले, रस्त्यावर बसून, झोपून, अन्न शिजवून व इतर कृत्ये करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळे आणले. तसेच त्यांनी रस्त्यावरील वाहनांचे टपावर चढुन कपडे काढून विक्षिप्त नाचकाम केले व रस्त्यावरील सिग्नल पोलवर चढून नारेबाजी केली होती. तसेच ,मुंबई शहरातील बेस्ट उपक्रमातील सिटी बसमध्ये घुसखोरी करून मुंबईतील नागरिकांशी गैरवर्तन करून भांडणे केली होती. अशा प्रकारे आपल्या आंदोलकांनी आपल्या आंदोलनादरम्यान नियमबाह्य वर्तन केले. यावरून असे स्पष्ट होते कि,आंदोलनात लाखो आंदोलक येणार असुन त्यावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही. यावरून आपण नियम क्र. ०७ चा भंग केला असल्याचे निदर्शनास येते.

तद्नंतर आपल्या आंदोलनातील आंदोलकांनी केलेल्या गैरकृत्यामुळे परिमंडळ दक्षिण-०१ च्या कार्यक्षेत्रात एकुण १३ दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. वरील बाबी पाहता आमची खात्री झालेली आहे कि,तुम्ही ''जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम, २०२५ च्या नियम क्र. ७'' या नियमाचा भंग करणार आहे.

ज्याअर्थी, नियम क्र. ११ (ट) नुसार आंदोलनात सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती वाहतूक मार्गावर व पदपथावर जमणार नाही किंवा अडवणार नाही असे नमुद करण्यात आले आहे. आज दि.१२/०९/२०२६ रोजी अंतरवाली सराटी येथे झालेल्या सभेमध्ये ''मुंबईत बसण्यासाठी सुध्दा लाखों करोडोंने या'' असे आवाहन केलेले आहेत.

त्यामुळे आपल्या आंदोलनात लाखो नागरीक सहभागी होत असल्याचे स्पष्ट होत असुन आंदोलनामुळे सामान्य जनजीवन व सार्वजनीक वाहतुक व अत्यावश्यक सेवा बाधित होणार

Scanned with OKEN Scanner

असल्याची खात्री झालेली आहे. परंतु आपल्या सन २०२५ साली झालेल्या आंदोलनातील आंदोलकांनी सोबत आणलेली सुमारे ५००० चारचाकी वाहने, ही दक्षिण मुंबईतील आझाद मैदान, मा. उच्च न्यायालय परिसर, मंत्रालय परिसर, कुलाबा, काळबादेवी, डोंगरी, पायधुनी, वाडीबंदर, इ. परिसरात आणली व त्यातील बहुतेक वाहने ही महात्मा गांधी मार्ग, दादाभाई नवरोजी मार्ग, महापालिका मार्ग, हजारीमल सोमाणी मार्ग, इ. मुख्य मार्गावर आणि सी.एस.एम.टी. जंक्शन, मेट्रो जंक्शन, ओ.सी.एस. जंक्शन, इ. मुख्य चौकांमध्ये दिनांक २९/०८/२०२५ पासून अनधिकृत रित्या उभी करून ठेवलेली होती. त्याद्वारे सदर रस्ते व चौकात रस्ता रोको करून, रस्त्यावर बसून, झोपून, अन्न शिजवून व इतर कृत्ये करून वेळोवेळी व सतत वाहतूक अडवलेली होती. त्यामुळे अनेक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास झालेला होता. मा सर्वोच्च न्यायालयाने ''अमित साहनी केस'' मध्ये लोकशाही आंदोलनामुळे सामान्य जनजीवन व वाहतूक बाधित होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत दिलेल्या निर्देशांचा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचीका क्रमांक २५६५६/२०२५, या प्रकरणातील आदेशामध्ये पुनरुच्चार केलेला असल्याचे आपणांस देण्यात आलेल्या परवानगी पत्रात सूचित करण्यात आले होते. तरी देखील आपण व आपले आंदोलक यांनी त्याचे पालन केलेले नव्हते. सबब आपण मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाचे तसेच नियम क्र. ११ (ट) चे देखील उल्लंघन केलेले होते. त्यामुळे आपण नियम क्र. ११ (ट) चा भंग करणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

ज्याअर्थी, नियम क्र.११(ज) अन्वये सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती विनिर्देशीत क्षेत्रात अन्न शिजवणार नाही किंवा केर कचरा टाकणार नाही असे नमुद आहे. मागील वर्षी झालेल्या आंदोलनादरम्यान मोठया प्रमाणात मालवाहतुकीच्या वाहनांनमध्ये तसेच रस्त्यावर अन्न शिजवुन वाटप केल्याचे निदर्शनास आलेले होते.तसेच राहीलेले अन्न हे रस्त्यावरच सोडलेले होते.त्यामुळे स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.तसेच सन २०२५ च्या आंदोलनादरम्यान सार्वजनिक जागेत, रस्त्यांवर, फूटपाथवर अंघोळ करणे इत्यादी प्रकार करून सार्वजनिक जन जीवनाचा, आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण केला होता.त्यामुळे यावर्षी सुध्दा त्याचप्रकारे पुनरावृत्ती होण्याची शक्यता असुन त्यामुळे सार्वजनीक आरोग्यास धोका निर्माण होईल याबाबत माझी खात्री पटलेली आहे. दि.२९/०८/२०२६ पासुन अंतरवाली सराटी येथे आपण आंदोलन व उपोषनादरम्यान वारंवार दि.१२/०९/२०२६ नंतर लाखों करोडो आंदोलकांना मुंबईत येण्याचे आवाहन केले आहेत.

ज्याअर्थी, आझाद मैदान परिसरात जी.टी. रूग्णालय, कामा रूग्णालय, सेंट जॉर्ज रूग्णालय, बॉम्बे हॉस्पिटल यासारखी मोठी सार्वजनिक रूग्णालये आहेत. मागील वर्षी आंदोलनादरम्यान सदरील परीसरातील रस्ते अडविल्या गेल्यामुळे वाहतुक ठप्प झाल्यामुळे रुग्णसेवेवर विपरीत परिणाम झाला होता. त्यामुळे यावर्षी सुध्दा सदरील परीसरातील सार्वजनीक आरोग्य बाधीत होणार आहे याबद्ल माझी खात्री पटली आहे. त्यामुळे आपण नियम क्र. ११ (ज) चा भंग करणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

ज्याअर्थी, दक्षिण मुंबई परिसरामध्ये मा. उच्च न्यायालय, मा.सत्र न्यायालय, महानगर दंडाधिकारी कार्यालयामध्ये यांच्या दैनंदिन कामकाजामध्ये सन २०२५ च्या आंदोलनादरम्यान बाधा निर्माण झाली होती. मा.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती यांना सुध्दा मा.उच्च न्यायालयात पोहचण्यासाठी बाधा निर्माण झाली होती.त्यामुळे यावर्षीच्या आंदोलनामुळे सुध्दा न्याय यंत्रणेच्या कामकाजामध्ये बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे याबद्ल माझी खात्री पटली आहे.

ज्याअर्थी, दक्षिण मुंबई हा मुंबई शहराचा तसेच देशाचा महत्वाचा मध्यवर्ती व्यापार क्षेत्र म्हणुन ओळखला जातो. याच परिसरात क्रॉफर्ड मार्केट, झवेरी बाजार, बॉम्बे स्टॉक

Scanned with OKEN Scanner

एक्सचेंज,आरबीआय, अशा महत्वाच्या आस्थापणा तसेच व्यवसायाची ठिकाणे आहेत. मागील वर्षी झालेल्या आंदोलना दरम्यान आंदोलन कर्त्यांनी संपुर्ण परीसर अनधिकृतपणे ताब्यात घेतल्यामुळे तेथील सर्व आर्थिक व्यवहार ठप्प पडले होते. त्यामुळे व्यापारी वर्गात मोठया प्रमाणात जनक्षोभ निर्माण होवुन सार्वजनीक सुव्यवस्था बाधीत झाली होती. मुंबई सारखे आर्थिक ठिकाण बंद पडल्यास त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे दुरगामी परीणाम होतात. त्यामुळे भारतीय संविधानाने प्रत्येक आंदोलन कर्त्यास कलम १९ प्रमाणे शांततेने आंदोलन करण्याचा हक्क दिला असला तरी त्यातीलच नमुद उपकलम ३ अन्वये सदरील अधिकार हे वाजवी र्निबंधांच्या अधिन आहेत. मागील वर्षी झालेल्या आंदोलना दरम्यान इतर नागरीकांचे हक्क व अधिकार बाधीत झाले होते. त्यामुळे यावर्षी सुध्दा आपण लाखों करोडो लोकांना मुंबईत येण्या संदर्भात केलेल्या आवाहनामुळे सार्वजनीक सुव्यवस्था बाधीत होणार आहे याबद्‌ल माझी खात्री पटली आहे.

ज्याअर्थी, दि.१४/०९/२०२६ रोजी पासुन मुंबई शहरात मोठया प्रमाणात गणेश उत्सव साजरा करण्यात येणार आहे. गणेश उत्सवादरम्यान भावीकांची होणाऱ्या अलोट गर्दीमुळे मुंबई हि कायम राष्ट्रविघातक शक्तीच्या निशाण्यावर राहीलेली आहे. त्यादृष्टीने अप्रिय घटना टाळण्यासाठी पोलीस प्रशासनातर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा सार्वजनीक सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन विविध उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.सदरील आंदोलना दरम्यान होणाऱ्या अलोट गर्दीमुळे सार्वजनीक सुरक्षिततेच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजनामध्ये बाधा निर्माण होणार आहे.

त्याअर्थी, उपरोक्त विवेचन केल्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाचे अमित सहाणी केस मध्ये दिलेले निर्देश मा.उच्च न्यायालय मुंबई,यांनी दिलेले निर्देश तसेच ''जाहिर सभा,आंदोलने व मिरवणुका नियम २०२५ मधील नियमावली यांचे नियम क्रमांक ४(६)(च), ५, ६, ७, १०, ११(ड), ११(ज),११(झ),११(ट) यांचा भंग आपल्याकडुन जाणीवपूर्वक करण्यात येईल याबाबत माझी खात्री पटलेली आहे.तसेच दक्षिण मुंबई परिसरातील सामान्य व्यवहार, जसे शाळा, रूग्णालय, व्यवसाय, न्यायपालीका, सार्वजनीक वाहतुक व सार्वजनीक आरोग्य बाधीत होवुन सार्वजनीक सुव्यस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याने मी याद्वारे आपण आझाद मैदान येथे दि.१९/०९/२०२६ रोजी पासुन आमरण उपोषन व आंदोलन यासाठी मागीतलेली परवानगी नाकारत आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे ★ मुंबई-१ ★ सत्यमेव जयते

(राजु बिडकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
आझाद मैदान पोलीस ठाणे,मुंबई

Scanned with OKEN Scanner